राज्य योजनाअंतर्गत योजना.
निसर्ग पर्यटनाअंतर्गत राज्यातील संरक्षित क्षेत्रातील व निसर्ग पर्यटन माहिती केंद्र, वनभवन, नागपूर विकासाचा सन २००८-२००९ चा पुरवणी मागणी प्रस्ताव

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.- डब्ल्यूएलपी-१०.०८/प्र.क्र.१५५/फ-१,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०२-०३-२००९

वाचा : (१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( अर्थसंकल्प, नियोजन व विकास यांचे )
पत्र क्र.कक्ष -१/पो/अर्थ त.क्र.१४(भाग-२)(०७-०८) दि.१३/५/२००८
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे पत्र क्र. कक्ष -२२(६)/वं/ पर्यटन/ नवाप्र/ ३१५/०८-०९ दि.९/६/२००८
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. पुरक-१०.०८/प्र.क्र.२३२/अर्थसंकल्प-३ दि.२० २ २००९
(४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एसयूपी-२००८/प्र.क्र.३४३/ब-१ दि.२७ २/२००९

1720..
25 3.09

प्रस्तावना :

सन २००८-०९ च्या वार्षिक योजनेमध्ये " संरक्षित क्षेत्रातील निसर्ग पर्यटन विकास " या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत रु. १०.०० कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आलेला असून गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाची स्थापना या राज्यस्तरीय योजनेसाठी उपलब्ध करुन दिलेला रु. २.०० कोटी इतका अतिरीक्त नियतव्यय निसर्ग पर्यटन विकास कामांसाठी वळता करण्यात आला आहे. या नियतव्ययास अनुसरुन राज्यातील राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये व व्याघ्र प्रकल्पांचा पर्यटन दृष्टीकोनातून विकासाचा सन २००८-२००९ चा नवीन बाब प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी रु.५८१.२० लाखाचा खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला होता.

| अ.क्र. | संरक्षित क्षेत्र | वनपर्यटनासाठी पर्यटकांना चांगल्या दर्जाची सोयी सुविधा पुरविणे<br>रक्कम रुपये लाखात |
|---|---|---|
| १ | २ | ३. |
| १ | ✓ पेंच व्याघ्र प्रकल्प | १०९.०० |
| २ | ✓ ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प | ९५.०० |
| ३ | ✓ मेळघाट व्याघ्र प्रकल्प (बोरी) | ११६.२८ |
| ४ | कळसूबाई ह.गड अभयारण्य | २०.०० |
| ५ | नांदुरमधमेश्वर अभयारण्य | ४०.०० |
| ६ | अनेरडॅम अभयारण्य | ८.३७ |
| ७ | यावल अभयारण्य | ८.०० |
| ८ | पैनगंगा अभयारण्य | ७.६० |
| ९ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली | १०.०० |
| १० | तानसा अभयारण्य | ११.०० |

24 MAR 2009

| | | |
|---|---|---|
| ११ | कर्नाळा अभयारण्य | १७.०० |
| १२ | फणसाड अभयारण्य | ३.०० |
| १३ | चांदोली अभयारण्य | ३.२० |
| १४ | राधानगरी अभयारण्य | ७.७५ |
| १५ | देवळगांव रेहकरी | ५.०० |
| १६ | निसर्ग पर्यटन माहिती केंद्र, वनभवन, नागपूर | १२.०० |
| | एकूण नवीन बाब (ब) | ४८१.२० |

३. उपरोक्त पुरवणी मागणीस विधानमंडळाची मंजूरी प्राप्त झाली असून या बाबतचा महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम २००८ (सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) प्रसिध्द झाला असून संदर्भ क्र. ४ येथील दि.२७/१/२००९ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे.

<u>शासन निर्णय :</u>

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्यापैकी पुरवणी मागणी व्दारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रकमेपैकी या शासन निर्णयान्वये रु. ४५०.२० लाख रक्कम खालील अटींच्या अधीन राहून विहीत कामांसाठी सन २००८-०९ मध्ये खर्च करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**प्रस्तावातील वाहन खरेदी आणि विदेश दौरा या दोन बाबी वगळता तसेच ताडोबा राष्ट्रीय उद्यानातील काळा आंबा ते भानूसखिंडी रस्ता मजबुतीकरण या कामावर रु.२१.०० लाख ऐवजी रु.२०.०० लाख खर्च करण्यात यावे.**

या अनुषंगाने या शासन निर्णयान्वये खर्चाच्या खालील बाबीस शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संरक्षित क्षेत्र | वनपर्यटनासाठी पर्यटकांना चांगल्या दर्जाची सोयी सुविधा पुरविणे | |
|---|---|---|---|
| | | मंजूर रक्कम रुपये लाखात | शेरा |
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पेंच व्याघ्र प्रकल्प | ९९.०० | वाहन खरेदी वरील रु.१०.०० लाख खर्च वगळून |
| २ | ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प | ९४.०० | **काळा आंबा ते भानूसखिंडी रस्ता मजबुतीकरण या कामावर रु.२१.०० लाख ऐवजी रु.२०.०० लाख** |
| ३ | मेळघाट व्याघ्र प्रकल्प (बोरी) | १०६.२८ | वाहन खरेदी वरील रु.१०.०० लाख खर्च वगळून |
| ४ | कळसूबाई ह.गड अभयारण्य | १०.०० | वाहन खरेदी वरील रु.१०.०० लाख खर्च वगळून |
| ५ | नांदूरमधमेश्वर अभयारण्य | ४०.०० | |
| ६ | अनेरडॅम अभयारण्य | ८.३७ | |
| ७ | यावल अभयारण्य | ८.०० | |
| ८ | पैनगंगा अभयारण्य | ७.६० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली | १०.०० | |
| १० | तानसा अभयारण्य | ११.०० | |
| ११ | कर्नाळा अभयारण्य | १७.०० | |
| १२ | फणसाड अभयारण्य | ३.०० | |
| १३ | चांदोली अभयारण्य | ३.२० | |
| १४ | राधानगरी अभयारण्य | ७.७५ | |
| १५ | देवळगांव रेहकरी | ५.०० | |
| १६ | निसर्ग पर्यटन माहिती केंद्र, वनभवन, नागपूर | १२.०० | |
| | एकुण नवीन बाब (ब) | ४५०.२० | |

२. सदर खर्च सन २००८-०९ या वित्तीय वर्षात प्रधान शिर्ष "२४०६ वनीकरण व वन्यजीवन, ८०० (०२) इतर खर्च, पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०२)(०६) इको टूरीझम (राज्य) (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेवर खर्च करतांना सोबत जोडलेल्या मासिक निधी विवरण पत्रानुसार व शासनाने दिलेल्या वेळोवेळी सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

४. उपरोक्त राष्ट्रीय उद्यान / अभयारणे व व्याघ्र प्रकल्प यांच्या निसर्ग पर्यटनांतर्गत विकास कामांमध्ये अंर्तभूत असलेल्या बांधकामांना / रस्त्यांच्या दुरूस्ती / बांधकामांना आवश्यक ती तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे आदेश सक्षम अधिकाऱ्यांनी निर्गमित केल्यानंतरच प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेला निधी संबंधितांना वितरीत करावा तसेच वनसंवर्धन अधिनियम, १९८० चा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही या अधीन राहूनच सदर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. अशाप्रकारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रु. ४८१.२० लक्ष निधीपैकी रु. ४५०.२० लक्ष निधी मासिक निधी विवरण पत्रानुसार खर्च करण्यास हरकत नाही.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७३/०९/अर्थ-६, दिनांक:२८.०२.२००९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शिरीष राणे )
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति :

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रत :

१) महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२) मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) मुंबई / अमरावती / नागपूर / नाशिक
३) मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) नागपूर